सकाळ

# सहकार शिक्षणातून संस्थांचा विकास

## डॉ. कदम : रवळनाथ हौसिंगतर्फे सहकार सप्ताहास प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १४ : 'सहकाराच्या विकासासाठी सहकार्यातून प्रयत्न केल्यास सहकाराचे सुंदर चित्र पाहायला मिळेल. सहकारातून समृद्धी कशी निर्माण करता येते याचे उत्तम उदाहरण श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी आहे. सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणातून सहकार क्षेत्राची प्रगती होईल. यामुळे सहकारी संस्थांनी अशा उपक्रमाद्वारे विकास साधावा,' असे आवाहन विभागीय सहनिबंधक डॉ. महेश कदम यांनी केले.




गडहिंग्लज : रवळनाथ हौसिंग फायनान्सतर्फे झालेल्या सहकार प्रशिक्षणात डॉ. महेश कदम यांनी मार्गदर्शन केले. शेजारी एम. एल. चौगुले, प्रा. संभाजी जाधव, डी. के. मायदेव, उत्कर्षा पोतदार आदी उपस्थित होते.

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी, सहनिबंधक कार्यालय, श्री महालक्ष्मी वुमेन्स को-ऑप. क्रेडिट सोसायटीतर्फे अखिल भारतीय सहकार सप्ताहाला आज प्रारंभ झाला. त्यानिमित्त सहकारी विकास सेवा संस्था सचिवांसाठी आयोजित सहकार प्रशिक्षणात ते बोलत होते. तात्यासाहेब मोहिते सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्रा. संभाजी जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. दीपप्रज्वलनाने सहकार प्रशिक्षणाला सुरुवात झाली.

डॉ. कदम यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. सचिन मांगले यांनी संचलन केले. प्रशासनाधिकारी प्रज्ञा पाटील यांनी सहकार शपथ दिली. सचिव संघटनेचे आनंदा पाटील, गजेंद्र कुरळे, संजय तोडकर, गुरुगोंडा पाटील यांचा सत्कार झाला. आनंदा पाटील यांचे भाषण झाले. रवळनाथचे सीईओ डी. के. मायदेव यांनी स्वागत केले. संचालक डॉ. आर. एस. निळपणकर यांनी प्रास्ताविक केले. संपदा घुगरे यांनी सूत्रसंचालन केले. महालक्ष्मीच्या अध्यक्षा पोतदार यांनी आभार मानले. उपाध्यक्षा मीना रिंगणे, प्राची मायदेव, संचालक, कर्मचारी, सचिव उपस्थित होते.